# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 175/2022 दिनांक : 30.04.2022**

## 1)खुनः–

**तामसा :–**दिनांक 25.04.2022 रोजी सायंकाळी 05.30 वा. ते 05.45 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या शेतात कोपरा शिवार ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे गंगाधर विश्वनाथ घुले, वय 56 वर्षे, रा. कोपरा ता. हदगाव जि. नांदेड**, यास यातील नमुद दोन आरोपी व इतर दोन अनोळखी इसम असे चौघांनी मिळुन संगणमत करुन दारुच्या नशेत मयत यास तु आम्हाला दारु का देत नाहीस म्हणुन शिवीगाळ करुन कुऱ्हाडीने मारुन गंभीर जखमी करुन खुन केला व फिर्यादीस गंभीर जखमी केले. वगैरे **फिर्यादी राजपाल विश्वनाथ घुले, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. कोपरा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरन 44/2022 कलम 302,324,504,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री उजगरे, मो.नं. 8975359100** हे करीत आहेत.

## 2)खुनाचा प्रयत्न :–

**तामसा :–**दिनांक 27.04.2022 रोजी चे 11.00 वा. ते 11.30 वा. चे दरम्यान, **मौ. जांभळा शिवारातील फिर्यादीचे शेतात ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी देवून फिर्यादीचे शेतात कब्जा करीत असताना त्यांना कब्जा करु नका आमचे शेताचे प्रकरण कोर्टात प्रलंबित आहे असे म्हणाले असता आरोपीने खंजरने डोळयावरती कपाळावर वार करुन जखमी केले फिर्यादीचे पत्नीचे डाव्या हाताच्या कोपऱ्याखाली खंजरने वार केला तसेच लोखंडी रॉड, तलवार, काठयाने मारहाण करुन खुन करण्याचा प्रयत्न केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी बाबुराव माणिकराव शेटे, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. जांभळा ता. हदगाव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरन 83/2022 कलम 307,326, 120(ब),109,324,323,504,506,143,147,148,149 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री चव्हाण, मो. नं. 7020408595** हे करीत आहेत.

## 3)आत्महत्येस प्रवृत केले :–

**उस्माननगर :–**दिनांक 09.03.2022 रोजी चे 09.30 वा. **गोळेगाव फाटयावर ता. लोहा व दिनांक 10.03.2022 रोजी 13.40 वा. चे सुमारास सरकारी दवाखाना विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील **मयत नामे जोगिंदरसिंघ चितोडीया, वय 18** वर्षे, **व्यवसाय जडीबुटी विक्रेता रा. रुक्मीनीनगर, अमरावती ह.मु. गोळेगाव ता. लोहा जि. नांदेड**, यास यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन मोबाईल चोरीचे कारणावरुन यातील मयत व मयताचे वडील यास जिवे मारण्याची धमकी दिली त्यांचे त्रासाला कंटाळुन मयताने उंदीर मारण्याचे औषध खाल्याने मरण पावला त्याचे आत्महत्येस यातील नमुद आरोपी हे कारणीभुत आहेत. वगैरे **फिर्यादी शारदाबाई जोगिंदरसिंघ चितोडीया, वय 46** वर्षे, **व्यवसाय घरकाम रा. रुक्मीनी नगर, अमरावती ह.मु. गोळेगाव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 76/2022 कलम 306,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री देवकत्ते मो.नं. 9307343434** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**1)विमानतळ :–** दिनांक 19.04.2022 रोजी 23.30 वा. ते दिनांक 20.04.2022 रोजी 02.30 वा. चे दरम्यान, **विश्वनाथ नगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो स्पेलंडर प्लस कंपनीची मो. सा. क्रं. एमएच–26/बीवाय–2936 किमती 50,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी गंगाधर सोपनराव तेलघाने,वय 46 वर्षे व्यवसाय ड्रायक्लिन चे दुकान रा. विश्वानाथगनर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 161/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/967 गायकवाड, मो.क्र. 9529796606** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :—** दिनांक 27.04.2022 रोजी 20.10 वा. ते 20.30 वा. चे दरम्यान, **वर्कशॉप कॉर्नर पाण्याची टाकी, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पेलंडर कंपनीची मो. सा. क्रं. एमएच–26/एए–5202 किमती 30,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी सय्यद सरफराज अली, वय 26 वर्षे व्यवसाय शिक्षण रा. पिरनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 152/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/614 सातारे, मो.क्र. 9823170905** हे करीत आहेत.

**3)उमरी :—** दिनांक 26.04.2022 रोजी 10.00 वा. ते 16.00 वा. चे दरम्यान, **प्रॉपर उमरी साई श्रध्दा ट्रेनिंग कंपनी मोंड उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो हिरो होंडा कंपनीची मो. सा. क्रं. एमएच–26/एयु–2522 किमती 30,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण मारोतराव राठोड, वय 35 वर्षे व्यवसाय मजुरी रा. रुपसिंग नगर, उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 119/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1691 कदम, मो.क्र. 8605580343** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :—

**विमानतळ :—** सप्टेंबर 2017 पासुन ते दिनांक 25.04.2022 पावेतो, **फिर्यादीचे राहते घरी कामठा (खु.), नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन तु जर माहेरहुन 50000/–रुपये घेवून ये नाही तर तुला व मुलीस खतम करतो म्हणुन तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 27 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 160/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1986 कानगुले**, **मो.क्रं. 9657707486** हे करीत आहेत.

## 6)अपघात :—

**भोकर :—** दिनांक 28.04.2022 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **भोकर ते नांदेड जाणारे रोडवर नारवट स्टॉप जवळ ता. भोकर जि.नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रफुल्ल सावन गायकवाड वय 30 वर्षे व्यवसाय मजुरी रा. भोसी ता. भोकर जि. नांदेड** हा नमुद ठिकाणी रोड ओलांडत असताना यातील नमुद आरोपी कार चालक क्र. एमएच/26–बीक्यु–1310 च्या चालकाने त्याचे ताब्यातील कार हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी श्रीमती प्रतिभा प्रफुल्ल गायकवाड वय 33 वर्षे व्यवसाय घरकाम रा. भोसी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 150/2022 कलम 279,337,338,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री एस. कांबळे, मो.क्र. 9923413244** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :—

**1)भाग्यनगर :—** दिनांक 28.04.2022 रोजी 20.45 वा. चे सुमारास, **मच्छी मोर्केट जवळ कॅनलरोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या नकली पिस्टल खरे अग्नीशस्त्रा सारखे दिसणारे ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/सुशांत गणपत किनगे, ने. पोस्टे भाग्यनगर,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 151/2022 कलम 6/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/81 बंडेवार, मो.क्र. 9923103778** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :—** दिनांक 29.04.2022 रोजी 15.45 वा. चे सुमारास, **गोकुळनगर, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी त्याचे ताब्यातील ॲटोमध्ये विनापरवाना बेकायदेशीर रित्या 25 तलवारी किंमती 62,500/–रुपयाचे वाहतुक करताना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/रवि वैजनाथराव वाहुळे, ने. पोस्टे शिवाजीनगर,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 164/2022 कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री सावंत, मो.क्र. 8308470270** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :—

**मरखेल :—** दिनांक 29.04.2022 रोजी चे 21.15 वा. चे सुमारास, **मौ. बैम्बरा बसस्टॅडजवळ ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी दारु किंमती 2000/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/नामदेव शिवाजी मद्दे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 70/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/338 वाघमारे, मो.क्र. 9552514590** हे करीत आहेत.

## 9)गळफास घेवुन मृत्यु :-

**मनाठा :-**दिनांक 28.04.2022 रोजी 16.00 वा. सुमारास, **मौजे कारला शिवार शेतात ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सिताराम दुलाजी पोटे, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. गारगोटवाडी ह.मु. कारला ता. हदगाव जि. नांदेड**, यांनी बॅकचे कर्जाला व सततचे नापिकीस कंटाळुन लिंबाचे झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार प्रसराम सिताराम पोटे, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. गारगोटवाडी ह.मु. कारला ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मनाठा** आ. मृ. **09**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1694 पवार, मो.नं. 9922921694** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 176/2022 दिनांक : 30.04.2022**

## पोलीस अधिक्षक कार्यालयात "संत तुकडोजी महाराज जयंती " साजरी

30 एप्रिल, 2022 रोजी शनिवार **"संत तुकडोजी महाराज"** यांची जयंती साजरी करण्यात आली आहे, **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले आहे. तसेच या प्रसंगी **मा. श्री निलेश मोरे,** अपर पोलीस अधिक्षक,नांदेड, **मा. डॉ. अश्विनी जगताप**, पोलीस उप–अधिक्षक (मुख्यालय), **मा. श्री सिध्देश्वर भोरे,** उप विभागीय पोलीस अधिकारी, इतवारा, **मा. श्री व्दारकादास चिखलीकर,** पोलीस निरीक्षक स्थागुशा, नांदेड, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, **इतर** शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन सपोउपनि उत्तम वाघमारे, सुर्यभान कागणे, पोना संजय सांगवीकर, पोकॉ विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे आयोजन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


निंदा स्तुती कोणा न करा कोणाची ।
नाही या देहाची शुद्धी कोणा ।।

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 177/2022 दिनांक : 30.04.2022**

## नांदेड पोलीस दलातील तीन पोलीस अधिकारी व सहा पोलीस अंमलदार सेवा निवृत्त

नांदेड पोलीस दलातील तीन पोलीस अधिकारी व सहा पोलीस अंमलदार हे नियत वयोमानानुसार दिनांक 30.04.2022 रोजी सेवानिवृत्त होत आहेत. **मा. पोलीस अधिक्षक श्री प्रमोद शेवाळे साहेब,** व अपर पोलीस अधिक्षक, **मा. श्री निलेश मोरे साहेब,** पोलीस उपअधिक्षक मुख्यालय नांदेड **मा. डॉ. अश्विनी जगताप,** यांचे हस्ते सर्व नऊ सत्कार मुर्तींना पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सदर सत्कार समारंभ पोलीस अधिक्षक कार्यालयात पार पडला. सदर सत्कार समारंभास. पोलीस कल्याण शाखेचे **पोनि श्री अनंत नरुटे,** जनसंपर्क अधिकारी **सपोनि श्री शिवाजी लष्करे तसेच ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी** मोठया संख्येने हजर होते. तसेच मपोकॉ राखी कसबे, यांनी कार्यक्रमाचे नियोजन चांगल्या प्रकारे केले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मपोकॉ रुपा कानगुले यांनी केले आणि आभार प्रदर्शन सपोनि श्री शिवाजी लष्करे यांनी केले.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अधिकारी/कर्मचारी नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | पोलीस निरीक्षक | मधुसुदन देविदास अंकुशे | बी.डी.डी.एस. |
| 02 | पोलीस उप निरीक्षक | विठ्ठल लालु जाधव | पो.स्टे. माहुर |
| 03 | पोलीस उप निरीक्षक | मिर्झा अन्वरबेग इब्राहीमबेग | वाचक शाखा मा.पो.अ.क.नांदेड |
| 04 | सपोउपनि/5254 | देविदास समाधान राठोड | जी.पी.यु. |
| 05 | सपोउपनि/5151 | मारोती बाबाराव कपाळे | पो.मु.नांदेड |
| 06 | सपोउपनि/5093 | बालाजी मनोहर पवार | पो.मु.नांदेड |
| 07 | सपोउपनि/5059 | उत्तम हरी राठोड | पो.स्टे. उस्माननगर |
| 08 | पोह/1880 | बालाजी गंगाराम श्रीरामे | जिविशा नांदेड |
| 09 | पोना/1155 | शिवाजी किशनराव हंबर्डे | पो.मु. नांदेड |

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड**



